# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## -- परिपत्रक --

क्र.संगाबाअवि/१/१०९/२-३६१/२०२० दिनांक – १७.५.२०२०

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय ...... संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व संलग्नित सर्व महाविद्यालये दिनांक ३१ मे, २०२० पर्यंत बंद ठेवणेबाबत.**

संदर्भ - १) परिपत्रक क्र.संगाबाअवि/१/१०९/२-३५९/२०२० दिनांक – ४.५.२०२०
२) महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, राहत व पुनर्वसन विभाग. मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.DMU/2020/CR.92/DisM-1, दि. १७ मे. २०२०
३) मा.जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र.कक्ष-२७/ कलि /गृहविभाग/ कावि-३४४/२०२० दि. १७.५.२०२०

राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील परिपत्रकाद्वारे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभाग, विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये दिनांक १७ मे, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तथापि, उपरोक्त संदर्भ क्र.२ वरील शासन आदेशानुसार कोरोना विषाणुचे देशभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढ्याच तत्परतेने व तीव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत निर्देशित केले असून Lockdown चा कालावधी दि. १८ मे २०२० ते दि. ३१ मे २०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे. त्याअनुषंगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभाग, विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये दिनांक १७ मे २०२० च्या पुढेही दिनांक ३१ मे २०२० पर्यंत बंद राहतील.

उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये मा. जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांनी दिलेल्या आदेशानुसार Lockdown च्या कालावधीत कार्यालयामध्ये काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱी यांनी 'आरोग्य सेतू' ॲप वापरणे बंधनकारक असून याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांची राहील. मा.जिल्हादंडाधिकारी यांनी संचारबंदी व इतर बाबीसंबंधी दिलेल्या सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे. त्याचप्रमाणे कोविड-१९ संदर्भात उपाययोजना व घ्यावयाची खबरदारी यासंदर्भात मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी (स्थानिक अकोला, यवतमाळ, बुलडाणा, वाशिम जिल्हा) यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संबंधित सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे.

तसेच Lockdown च्या कालावधीदरम्यान शिक्षक, संशोधक, संवैधानिक अधिकारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मुख्यालय न सोडता घरी राहून (Work from home) संबंधित विभागाचे कामकाज करावे. त्याचप्रमाणे कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरिता संबंधित शिक्षक, संशोधक, संवैधानिक

अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांना वरिष्ठांनी कार्यालयात बोलाविल्यास त्यांना कार्यालयात त्वरित हजर व्हावे लागेल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, साफसफाई विभाग, उद्यान विभाग व इतर अत्यावश्यक सेवा) पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी याबाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

- आदेशान्वये.

डॉ.तुषार देशमुख
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रति,
1) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
2) मानद संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.
3) प्राचार्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये.

प्रत माहितीकरिता सविनय सादर –

1) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
2) मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. जिल्हादंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.
४) सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) सहसंचालक (उच्च शिक्षण), अमरावती विभाग, अमरावती.
६) सहसंचालक (तंत्र शिक्षण), विभागीय कार्यालय, अमरावती.

----

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 17th May 2020**

# ORDER

**Providing additional Human Resources to the Home Department for assisting Police Personnel the containment of COVID-19 in the State**

**Reference**:

1) The Epidemic Diseases Act, 1897
2) The Disaster Management Act, 2005
3) Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation Department Order No. DMU-2020/C.R.92/DMU-1, dated 2nd May 2020, 3rd May 2020, 5th May 2020, 11th May 2020 and 15th May 2020
4) Ministry of Home Affairs (MHA) Order No. 40-3/2020-DM-I (A) Dated 1st May 2020, 11th May 2020

Whereas, in exercise of the powers, conferred under the Disaster Management Act 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee has issued an Order dated 2nd May, 2020 to extend the lockdown measures up to 17th May, 2020 and issued revised consolidated guidelines from time to time vide above mentioned orders to contain the spread of COVID-19.

Whereas the State Government is satisfied that the State of Maharashtra is threatened with the spread of Covid-19 Virus, and therefore to take certain emergency measures to prevent and contain the spread of the virus, the Government in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897, read with all other enabling provisions of The Disaster Management Act, 2005, it is expedient to extend the lockdown in the entire State of Maharashtra further till midnight of 31st May 2020.

Now, therefore, in exercise of the powers conferred under section 2 of the Epidemic Diseases Act, 1898 and the powers, conferred under the Disaster Management Act, 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee, hereby issues directions to extend the lockdown till 31st May 2020 for containment of COVID-19 epidemic in the State and all Departments of Government of Maharashtra shall strictly implement the guidelines issued earlier form time to time.

It is further directed that all earlier orders shall be aligned with order and shall remain in force up to and inclusive of 31st May 2020. The calibrated phase wise relaxation / lifting of lockdown orders will be notified in the due course.

BY ORDER AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA

Ajoy Mehta

(AJOY MEHTA)
CHIEF SECRETARY
GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Copy to:**

1. Principal Secretary to Hon'ble Governor of Maharashtra, Mumbai,
2. Hon'ble Chairman, Maharashtra Legislative Council,
3. Hon'ble Speaker, Maharashtra Legislative Assembly,
4. Principal Secretary to Hon'ble Chief Minister, Government of Maharashtra,
5. Secretary to Hon'ble Deputy Chief Minister, Government of Maharashtra,
6. Private Secretary to Leader of Oppostion, Legislative Council / Assembly,
7. Private Secretaries of All Hon'ble Minister/Minister of State, Mantralaya,
8. All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/Secretaries of Government of Maharashtra,
9. Director General of Police, Maharashtra State, Mumbai,
10. Principal Secretary, Public Health Department, Mantralaya,
11. Secretary, Medical Education, Mantralaya,
12. All Divisional Commissioners in the State,
13. All Commissioners of Police in the State,
14. All Commissioners of Municipal Corporations in the State,
15. All District Collectors,
16. All Chief Executive Officers, Zilla Parishad,
17. All District Superintendents of Police in the State.

## जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

कॅम्प अमरावती ४४४ ६०२

(गृह विभाग)

☎ : ०७२१-२६६२०२५/२६६२४९३     फॅक्स : ०७२१-२६६२८४३

Email:- homebranch.collamt@gmail.com     Website :- www.amravati.nic.in


क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-384 /२०२०     दिनांक :-१७ /०५/२०२०

**वाचा :-** १. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५

२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७

३. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२४६/२०२० दि. २३/०३/२०२०

४.या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२४८/२०२० दि. ३१/०३/२०२०

५. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२७१/२०२० दि. १४/०४/२०२०

६.महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील लॉकडाऊन सूचनापत्र क्र. डिएमयु/२०२०/सीआर.९२/ दि. १७/०४/२०२०

७. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- २४५/२०२० दि. २३/०३/२०२०

८. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- २६२/२०२० दि. ११/०४/२०२०

९. केंद्रीय गृह सचिव, गृह मंत्रालय भारत सरकार यांचेकडील सूचना पत्र No. ४०-३/२०२०-DM-I (A) दिनांक ०१.०५.२०२०

१०. महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील लॉकडाऊन सूचनापत्र क्र. डिएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ दि. ०२/०५/२०२०

११. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-४४५/२०२० दि. ०३/०५/२०२०

१२. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-३३५/२०२० दि. ०५/०५/२०२०

१३. महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील लॉकडाऊन सूचनापत्र क्र. डिएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ दि. १७/०५/२०२०

## आदेश

**(संचारबंदी आदेश दि. १८/०५/२०२० ते ३१/०५/२०२० पर्यंत)**

ज्या अर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये अमरावती जिल्हयाचे क्षेत्रातील कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता वाचा क्र. ३, ४, ५ व ११ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) नुसार मागील संचारबंदीचे आदेश पारीत करण्यात आले होते. तथापी महाराष्ट्र शासनाने वाचा क्र. १३ अन्वये लॉकडाऊनचा कालावधी हा दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत वाढविलेला असल्याने **वाचा क्र. ११ अन्वये पारीत करण्यात आलेल्या संचारबंदी आदेशातील सर्व सूचना, मुददे तसेच कायम ठेऊन संचारबंदीचा कालावधी हा दिनांक १८/०५/२०२० ते दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

वाचा क्र. ७ अन्वये अमरावती जिल्हयाच्या सिमेवरुन प्रवेश करणाऱ्या वाहनांना प्रतिबंध करण्याकरीता अमरावती जिल्हयालगत असलेल्या सर्व सिमावर्ती ठिकाणी पोलीस आयुक्त (शहर) अमरावती व पोलीस



Scanned by CamScanner

अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांनी नाकेबंदी करुन विना परवाना प्रवासी वाहतूक यांना प्रवेश करण्याकरीता प्रतिबंध करावा व तहसिलदार, पोलीस, आरोग्य यंत्रणनेने संबंधितांना संस्थानात्मक विलगीकरण (Institutional Quarantine)/गृह विलगीकरण (Home Quarantine) करावे. वाचा क्र. ७ च्या आदेशाचा कालावधी हा वाचा क्र. ११ अन्वये दिनांक १७.०५.२०२० पर्यंत वाढविण्यात आला होता. त्यानुसार हा कालावधी या आदेशान्वये पुन:श्च दिनांक १८/०५/२०२० पासून दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत वाढविण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

वाचा क्र. १० च्या सूचनापत्रान्वये महाराष्ट्र शासन यांनी या लॉकडाऊनमध्य पालन करावयाच्या दिलेल्या मार्गदर्शक सूचना हया संदर्भिय क्र. ११ च्या आदेशान्वये खालीलप्रमाणे नमुद करण्यात आल्या होत्या हया सुध्दा संचारबंदीच्या कालावधीत दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत लागू राहतील.

१. ज्या ठिकाणी Cluster & Containment Zone निर्माण झाले आहेत तेथे संदर्भिय क्र. १२ अन्वये दिलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना लागू राहणार नाहीत. लॉकडाऊनच्या काळात एखादे नविन क्षेत्र हे Cluster & Containment Zone म्हणून घोषित झाल्यास ते घोषित होण्यापूर्वी सदर क्षेत्रात लागू असलेल्या सर्व सवलती व सुट हया क्षेत्र घोषित झाल्यापासून रदद झाल्या असे समजण्यात येईल.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती, आयुक्त महानगरपालीका अमरावती, मुख्याधिकारी नगर परिषद/नगर पंचायत यांनी Cluster & Containment Zone क्षेत्रात निवासी असणाऱ्या नागरिकांना आरोग्य सेतू ॲप व्दारे १००% संरक्षण प्राप्त होईल याकरीता प्रयत्न करावे.
३. ६५ वर्ष व त्यावरील वृध्द, आजारी व्यक्ती, गर्भवती महिला, १० वर्षाखालील मुले यांनी आवश्यक व आरोग्यविषयक कारणांशिवाय घराबाहेर पडु नये.
४. लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये सर्व प्रकारची कटिंग, सलुन, स्पा इ. ची दुकाने ही पूर्णपणे बंद राहतील. परवानगी दिलेल्या व्यक्ती अथवा वाहनांना या कालावधीमध्ये वाहतूक करता येईल.
५. शासकीय/खाजगी/सार्वजनिक क्षेत्र कार्यालयामध्ये काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना आरोग्य सेतू हे ॲप वापरणे बंधनकारक करावे. याबाबतची जबाबदारी ही संबंधित कार्यालय प्रमुख यांची राहील. शासकीय/खाजगी/सार्वजनिक क्षेत्र कार्यालयामध्ये आठवडयातून एकदा निर्जंतुकीकरण नियमितपणे करण्यात यावे.

वाचा क्र. १२ च्या आदेशान्वये दिनांक ०५.०५.२०२० पासून संचारबंदीच्या कालावधीत अत्यावश्यक व मुलभूत सेवा यांना सुट देण्याबाबत आदेश पारीत करण्यात आले आहे. त्यानुसार सदर आदेशामधील नमुद सर्व मुददे व सूचना तसेच आदेश हे कायम ठेवण्यात येत असून सदर आदेशान्वये नमुद करण्यात आलेली वेळ सकाळी ७.०० ते ३.०० ही कायम ठेवण्यात येत आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. उक्त संदर्भिय क्र. १२ च्या आदेशातील यापुढे संचारबंदी कालावधीत अत्यावश्यक व मुलभूत सेवा यांना देण्यात आलेली सूट हि दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत कायम ठेवण्यात येत आहे.

तसेच अमरावती शहर व ग्रामीण जिल्हयामध्ये सर्व शाळा/कॉलेज, सिनेमागृहे, आठवडी बाजार, साप्ताहीक बाजार, जनावरांचे बाजार, उत्सव, जत्रा, इ. बंद ठेवण्यात यावे. यापूर्वी च्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे जिवनावश्यक व इतर आस्थापना, दुकाने ही दररोज सकाळी **७.०० ते दुपारी ३.०० वा. पर्यंत** (Containment Zone वगळून) या कालावधीत सुरु राहतील, दुकाने सुरु झाल्यानंतर सर्व दुकानदारांनी दर शनिवारी संचारबंदीच्या शिथिलता कालावधी नंतर सोमवारी सकाळी ७.०० वाजेपर्यंत (म्हणजेच शनिवारी दुपारी ३.०० वा. पासून ते सोमवारी सकाळी ७.०० वा. पर्यंत) सर्व दुकाने बंद ठेवण्यात यावी. यावेळी दुकानांची साफसफाई, स्वच्छता व निर्जंतुकीकरण करुन घ्यावे व याबाबतची आकस्मीक तपासणी ही महानगरपालीका/मुख्याधिकारी यांनी वेळोवेळी करावी. सर्व प्रकारची औषधी व रुग्णालये ही नियमितपणे सुरु राहतील.



Scanned by CamScanner

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती यांनी सायन्सकोर मैदान, दसरा मैदान, भाजीबाजार येथील भाजीपाला व फळ यार्ड पुढील आदेशापर्यंत बंद ठेवावी. अमरावती जिल्हयामधील शहरी व ग्रामीण भागांमध्ये संदर्भिय क्र. ११ अन्वये पारीत करण्यात आलेले सदर संचारबंदीच्या आदेशातील सर्व मुददे व सूचना तसेच आदेश कायम ठेवण्यात येत असून संचारबंदीचा कालावधी हा दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत वाढविण्यात येत आहे. संबंधितांनी याबाबत नोंद घेऊन त्या प्रमाणे आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांना सदरचे आदेश तात्काळ अंमलबजावणीकरीता निर्गमित करावे.

उक्त संचारबंदीमध्ये अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील या आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल अशा व्यक्ती, संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास या संदर्भिय क्र. ८ च्या आदेशाव्दारे प्राधिकृत करण्यात आलेले आहे. सदर चे आदेश सुध्दा दि. ३१/०५/२०२० पर्यंत कायम ठेवण्यात येत आहे.

सदरचे संचारबंदीचे आदेश हे दिनांक १८/०५/२०२० चे ००.०० वा. पासून ते दिनांक ३१/०५/२०२० चे २४.०० वा. पर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. सदरहू आदेश आज दिनांक १७/०५/२०२० रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला.

या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती होण्याकरीता ध्वनीक्षेपकाव्दारे Public Address System व्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.

DISTRICT MAGISTRATE AMRAVATI

(शैलेश नवाल) १७/५
**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

**प्रतिलिपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२.पोलीस आयुक्त (शहर)/ पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
**/- पोलीस विभागाने याबाबत ध्वनीक्षेपकावरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.**
३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
६. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
७.अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
८. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
९. उपविभागीय दंडाधिकारी ----------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
१०. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अमरावती ----------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
११. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत --------------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.



Scanned by CamScanner

१२. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती यांना माहिती व उचित प्रसिध्दीकरीता रवाना.
**/- सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**
१३. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१४. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१५. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१६. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
१७. व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय,नागपुर यांना माहिती करीता तथा शासकिय राजपत्रात वरील आदेशाची प्रसिध्द करुन ५ प्रती या कार्यालयास सादर करण्यात यावा.
१८. संबंधित सर्व विभाग ------------------------------यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

DISTRICT MAGISTRATE AMRAVATI.

**जिल्हादंडाधिकारी अमरावती**



Scanned by CamScanner